। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ८४ वा । मंगळवार, दिनांक १६ जून २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.    RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# भारतात टेलिग्रामवर बंदी

## नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई/ प्रतिनिधी:** २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या 'नीट' परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कडक पावले उचलली आहेत. परीक्षेच्या पारदर्शकतेबाबत कोणतंही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये, यासाठी शिक्षण मंत्रालय आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीए यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर, विशेषतः टेलिग्रामसारख्या प्सवर करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने २२ जूनपर्यंत टेलिग्रामवर बंदी घातली आहे. कुठलाही गैरप्रकार, पेपरफुटी हे घडू नये यासाठी केंद्र सरकारने ही खबरदारी घेतली आहे. याआधी ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर हा टेलिग्रामवर ४८ तास आधी फुटला होता.

**एनटीए च्या शिफारसींनुसार तात्पुरती बंदी**


परीक्षेतील गैरप्रकारांवर मोठी कारवाई करत, केंद्र सरकारने देशभरात टेलिग्राम या मेसेजिंग पवर अधिकृतपणे बंदी घातली आहे. आगामी नीट (यूजी) २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पेपरफुटी आणि फसवणुकीचे रॅकेट रोखण्यासाठी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या छढ- थेट शिफारशींनुसार ही तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. एनटीएने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने या प्लॅटफॉर्मवर कठोर, कालबद्ध निर्बंध लागू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६९अ अंतर्गत आपत्कालीन अधिकारांचा वापर केला आहे.

**एडिटिंग सुविधा ३० जूनपर्यंत बंद**

भारतातील टेलिग्राम प्लॅटफॉर्मवरील सार्वजनिक प्रवेश २२ जून २०२६ रोजी संपणाऱ्या एका निश्चित कालावधीसाठी पूर्णपणे प्रतिबंधित करण्यात आला आहे. यामध्ये नीट (यूजी) पुनर्परीक्षेच्या आधीचे, परीक्षेदरम्यानचे आणि परीक्षेनंतरचे महत्त्वाचे दिवस थेट समाविष्ट आहेत. त्याचबरोबर टेलिग्रामला भारतातील पूर्वी पोस्ट केलेल्या सर्व मेसेजसाठी एडिटिंग सुविधा ३० जून २०२६ पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**एनटीए च्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात काय म्हटलंय?**

देशभरातील लाखो नागरिक, तरुण आणि व्यावसायिक हे शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि वैयक्तिक संवादासाठी दैनंदिन जीवनात टेलिग्रामचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. या तात्पुरत्या बंदीमुळे सर्वसामान्य युजर्सना होणाऱ्या मनस्तापाबद्दल आणि गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. परंतु, लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लागलेल्या 'नीट-युजी २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेची विश्वासार्हता आणि पवित्रता जपण्यासाठी हे पाऊल उचलणे अत्यंत अनिवार्य होते. हा निर्णय केवळ मर्यादित कालावधीसाठीच घेण्यात आला असून, २१ जूनची मुख्य फेरपरीक्षा सुरक्षित आणि चोख वातावरणात पार पडल्यानंतर परिस्थिती



पूर्वपदावर येईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.२१ जूनच्या नीट परीक्षेची पारदर्शकता जपण्यासाठी सरकार ॲक्शन मोडमध्ये आलं आहे.

# एसटी महामंडळाच्या लातूर विभागात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

**लातूर/ प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण व्हावे, या उद्देशाने एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या अनुषंगाने लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार लातूर विभागातील या उपक्रमाची सुरुवात १७ जून २०२६ रोजी औसा आगारातून होणार असून, त्यानंतर २४ जून रोजी उदगीर, १ जुलै रोजी निलंगा, ८ जुलै रोजी अहमदपूर आणि २२ जुलै २०२६ रोजी लातूर आगार येथे या विशेष मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे. या जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक संबंधित आगारात एकाच दिवशी दोन सत्रांत हा उपक्रम राबविला जाणार असून, पहिल्या सत्रात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत 'प्रवासी राजा दिन' आयोजित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवासी, विविध प्रवासी संघटना, तसेच शाळा व महाविद्यालयांचे प्रतिनिधी




सहभागी होऊन आपल्या बस सेवेसंबंधीच्या अडीअडचणी, तक्रारी आणि सुधारणांसाठीच्या सूचना लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतील. प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत 'कामगार पालक दिन' राबविण्यात येणार असून, यामध्ये एसटी कर्मचारी आणि कामगार संघटनांचे प्रश्न ऐकून घेत कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रश्न, रजा मंजुरी, कर्तव्याचे वेळापत्रक आणि प्रशासकीय कारवाई यांसारख्या तक्रारी व अडीअडचणींचे तात्काळ निराकरण केले जाणार आहे.

# वादळी वाऱ्याने आनंदवाडीतील शाळा,अंगणवाडीचे मोठे नुकसान



**शिरूर अनंतपाळ/ आजगर मचकुरी :** तालुक्यातील आनंदवाडी येथे शनिवारी वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडीवरील पत्रे उडाली. तसेच सोलार सिस्टिम चे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरपंच भागवत वंगे यांनी येथील तहसील कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधला मात्र, प्रतिसाद मिळाला नाही.

त्यामुळे नुकसानीचा अद्याप पंचनामा झाला नाही. तालुक्यात शनिवारी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. त्याचा फटका आनंदवाडीतील अंगणवाडीस बसला. लोखंडी अँगल सह पत्रे उडाली. तसेच जिल्हा परिषद शाळेचे ही नुकसान झाले. शाळा सुरू होण्याचा एक दिवस अगोदरच ही घटना घडल्याने गावचे सरपंच भागवत वांगे यांनी तहसीलच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधला मात्र, प्रतिसाद मिळाला नाही.

या घटने जवळपास दीड ते दोन लाखांचे नुकसान झाल्याचे सरपंच वंगे यांनी सांगितले. दरम्यान सरपंच गंगे यांनी जिल्हाधिकारी डॉ.बास्टेवाड यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून माहिती दिली.

## लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद

**लातूर/ प्रतिनिधी:** उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे आदेश जारी केले आहेत.

व सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## हेल्मेट घातले नसल्याने नियंत्रण सुटलेल्या दुचाकीची उभ्या वाहनास धडक; २५ वर्षीय युवकाचा मृत्यू

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर शहरातील इंडियानगर परिसरात दुचाकीवरील नियंत्रण सुटून उभ्या असलेल्या वाहनास धडक दिल्याने एका २५ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला असून, त्याने हेल्मेट परिधान केले असते तर त्याचा निश्चितपणे जीव वाचला असता. दि. १४ जून २०२६ रोजी आदित्य बाळासाहेब खरे (वय २५ वर्षे, रा. दत्तनगर, लातूर) हा त्याच्या ताब्यातील दुचाकीवरून इंडियानगर परिसरातून जात असताना अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे त्याची दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या कारवर जोरात आदळली. या अपघातात आदित्य याच्या डोक्याला, चेहऱ्यासह हात-पायांना गंभीर दुखापत झाली व त्याचा मृत्यू झाला.प्राथमिक तपासात अपघातावेळी मयत युवकाने हेल्मेट परिधान केले नसल्याचे समोर आले आहे. रस्ते अपघातांमध्ये डोक्याला होणारी दुखापत ही मृत्यूचे प्रमुख कारण ठरत असून, हेल्मेट हा दुचाकीस्वाराचा सर्वात महत्त्वाचा सुरक्षाकवच आहे. या घटनेतही डोक्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे युवकाचा जीव गेला असून, हेल्मेटचा वापर केला असता तर गंभीर इजा टाळता आली असती, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. लातूर पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर अनिवार्यपणे करावा. वाहतूक नियमांचे पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे आणि सुरक्षिततेची काळजी घेणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी आहे. क्षणिक निष्काळजीपणा कुटुंबासाठी कायमचे दुःख निर्माण करू शकतो. हेल्मेट हा दंड टाळण्यासाठी नव्हे, तर जीव वाचविण्यासाठी आहे.




## प्रभात किरणे

अडचणीत धावून यावा असा
एखादी जीवलग मित्र असावा
रक्ताचा,जातीचा काय भरोसा
काळजात मित्र जपून ठेवावा
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



जिल्हा परिषद शाळेत मूल्य आधारित शिक्षण सुरू करणार- मुख्यमंत्री

## चिमटा

दयाचा



पावसाचे भाकित
सांगणारे अंदाज
सांगता-सांगता
थकून गेले!
शेवटी विज्ञानाशिवाय
पर्याय नाही हेच
कळून आले!!






ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## पावसाने मारली दडी....

सात जूनला मृग नक्षत्र निघाला, सर्वांना आनंद झाला. मृगनक्षत्रावर राज्यातील शेतकरी पेरण्या सुरू करतात. सात जूनपासून पावसाला सुरवात होती हा आज पर्यंतचा अनुभव आहे. शेतकरी जरी विज्ञानाला धरून चालत नसतील तरी त्यांचा अनुभव मोठा आहे. अंदाज नुसार चालतात. त्यांचा अंदाज सहसा वाया किंवा चुकीचा ठरत नाही. असे तरी असले तरी आजकालचे प्रगत विज्ञान फोल ठरत आहेत. आज जे अंदाज वर्तविले जात आहेत. ते अंदाज असल्याने चुकीचे ठरत आहेत. पहिल्यांदा विज्ञान युगात अंदाज सांगणे बंद केले पाहिजे. आपल्या भारतात अनेक शोध लावले. विज्ञानाच्या प्रगती अगोदर भारतीयांनी शोध लावले. रामायन किंवा महाभारतातील युद्ध हा दाखला आहे. असे असताना अंदाज सांगून शेतकऱ्याची चेष्टा होत आहे हे दुःखाने म्हणावे लागते. कोणी अंदाज सांगा असे म्हणत नाही. उठसुट सोशलमिडीयावर अंदाज व्यक्त करून सावध करण्यापेक्षा उलट नुकसानीचे ठरत आहे. मुळात अंदाज हा धोकादायक ठरू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. वरचेवर उष्णतेचे प्रमाण वाढते आहे. ही आता जागतिक समस्या आहे. जग आता या उष्णतेबाबत चिंतेत आहे. त्यात वाढत्या प्रदुषनामुळे निसर्ग लहरी बनला. ऋतूमानात बदल होत आहे. वातावरणातील बदलाचा परिणाम सर्वजन पाहात आहोत. त्यामुळे यावर्षी मोठ्या संकटात सापडतो की काय अशी भीती वाटत आहे. जून महिणा उजेडून पंधरा दिवस झाले आहेत अजून मनासारखा पाऊस पडला नाही. तसे चिन्ही दिसून येत नाहीत. त्यामुळे पेरणी किती दिवस लांबणीवर पडते या बाबत शंका व्यक्त केली जात आहे. राज्यात अंदाज सांगणाऱ्यांना काही निर्बंध घातले पाहिजे. एकच शासनाचा अधिकृत असा सल्ला देणारा असावा. नसता काय होत आहे तर भीती निर्माण होत आहे. राज्यात आता जलसाठे आटायाला लागले आहेत. त्यात तिव्र उन्हामुळे मोठ्या प्रमाणात बाप्पीभवन होत आहे. यामुळे पाण्याबाबत चिंता निर्माण होत असून पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. जूनचा महिणा हा पावसाळ्याचा महिणा आहे. या महिण्यात प्रचंड उखाडा जाणावत आहे. वास्तविक हा प्रसंग का निर्माण झाला आहे. यावर संशोधन होणे आवश्यक आहे. संशोधनानुसार मत व्यक्त केले पाहिजे. आलिकडे सोशलमिडीयावर अंदाज सांगणारे अनेकजन दिसून येत आहेत. पुर्वी एखादा होता आता पायलीचे खंडीभर दिसून येत आहेत. ढोबळ विचार केला तर निसर्गाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. झाडे तोड मोठ्या प्रमाणता झालेली व होत आहेत. तसा विचार केला तर दरवर्षी किंवा वर्षभर वृक्षारोपनाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. सामाजिक सेवाभावी संस्था किंवा सरकारी पातळीवर वृक्षारोपन होते ते कोठे जातात. त्यामुळे आता पहिल्यांदा वृक्षारोपनाचे ऑडीट होणे अपेक्षित आहे. शासन स्तरावर झाडे लावली तर गेली कोठे याचा तपास केला पाहिजे. या बाबत तरी फसवेगिरी होवु नये अशी अपेक्षा आहे. मोठ-मोठी काँक्रेटची जंगले निर्माण होत आहेत, याला आळा घातला पाहिजे. नुसते निसर्ग जपण्याचा देखावा व फसवेगिरीने वृक्षारोपन होणे बंद केले पाहिजे. राज्यात एवढी लाख वृक्षारोपन करण्याचा संकल्प केला ती लाखो झाडे गेली कोठे? कोणीही नागरिकांनी या बाबत विचारणा केली नाही. या बाबत नागरिक सुद्धा जबाबदार आहेत हे लक्षात येते. वेळेवर पाऊस झाला, वेळेवर पेरण्या झाल्यातर सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होते. चोऱ्या, लुटीचे प्रकार होत नाहीत. सध्याला मार्केट ओस पडत आहेत. बाजारात खरेदीसाठी गिराईक कमी झाले आहेत. अशीच परिस्थिती राहीली तर मोठे संकट येवू शकते. सर्वात महत्त्वाचा पावुस आहे. हे माहिती असून पावसा साठी पोषक वातावरण निर्माण केले जात नाही निसर्गाचा ऱ्हास केला जात आहे. मोठ्या प्रमाणता झाडाची कत्तल होत आहे. वन विभाग हा आंधळा बदला आहे. त्याला दिसून येत नसेल तर आंधळा म्हणावे लागते? जर पोषक वातावरण असेल तर पावुस वेळेवर पडला असता. हे गणिक सर्वांना कळते. सरकारला कळते. जनतेला कळते मात्र वळत नाही हेच मोठे दुर्दैव आहे. भारतात बऱ्याच वेळा अधिक पावसाने काही राज्य प्रभावित होतात तर काही राज्य पाण्यअभावी दुष्काळग्रस्त होतात. अशी स्थिती का निर्माण होते याचे कारण शोधले पाहिजे. अधिक पाणी झाले तर त्याचा निचरा होण्यासाठी उपायोजना नाही. त्याच प्रमाणे नद्या जोड कार्यक्रम कागदावरच दिसून येतो. मुळात काही बाबी सरकारनेच कराव्यात असे का वाटते? काही वेळा नागरिकांनी सुद्धा आपण होवून समाजिक, जनतेला लाभदायक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. जिल्हास्तरावर उपक्रम हाती घेतला पाहिजे. नदीतील गाळ काढणे, खोलीकरण, गावतळे, शेततळे ही आता काळाची गरज आहे. हे उपक्रम लोकसहभागातून होणे अपेक्षित आहेत. सरकारकडून होणे अशी अपेक्षा करणे योग्य नाही. येथे भ्रष्टाचार होण्याचे चांन्सेस नाहीत. कामे दर्जेदार होतील. आता गाव पातळीवरचे कामे लोकसहभागातून झाली पाहिजेत. याला लागणारी यंत्रसामुग्री सरकारने पुरविणे आवश्यक आहे. जसे जीसीबी आदि यंत्र सरकारकडून मिळाली पाहिजे. सध्याला पावसाने दडी मारल्याने मोठे संकट आले आहे. यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. राज्यातील जनतेने सक्तीने एकवर्ष एकही झाड तोडू नये. तोडताना दिसला की, गावकऱ्यांनी त्याला हाणला पाहिजे. काही तरी सक्ती, नियम लोकसहभागतून झाले तरच नैसर्गिक संकटावर मात करता येवू शकेल. नसता एक ना एक दिवस मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागेल. त्यावेळी पर्यायही सापडणार नाही. पहिल्यांदा अंदाज सांगण्यावर निर्बंध आणावे. परदेशात अशी व्यक्ती दिसून येत नाही. वातावरणात किंवा भुगर्भात काही हालचाली वाढल्यातर तातडीने सावधगिरीचा सल्ला दिला जातो. अशी प्रगत यंत्रणा भारताने विकसीत करावी. परदेशात अंदाज सांगितला जात नाही तर तंतोतंत माहिती दिली जाते. तशी यंत्रणा असावी. लबाड बोलणारे सोशल मिडीयावर असतील तर त्याचा तातडीने बंदोबस्त करावा. अशा अंदाज सांगण्याची संख्या वाढती आहे ती सामाजिक घातक ठरत आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

# शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : ‘शाळा प्रवेशोत्सव’

राज्यातील सर्व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे या उद्देशाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्यावतीने ‘शाळा प्रवेशोत्सव’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होईल आणि शैक्षणिक वर्षाची सुरूवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात होईल. यासाठी विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रात यंदाचा ‘शाळा प्रवेशोत्सव’ १५ जून २०२६ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या पार्श्वभूमीवर शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सवासाठी व्यापक नियोजन केले असून राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी राज्यभरातील विविध शाळांना भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे शाळांमधील पटसंख्येतील घट कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत पटसंख्येत वाढही दिसून आली. या सकारात्मक परिणामांच्या आधारे यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक पद्धतीने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत प्रत्येक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे. ‘पहिले पाऊल’ या संकल्पनेअंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना दिली जाणार आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण करण्यात येणार असून शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा केला जाणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची सक्रिय भूमिका निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याने किमान एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करायचे असून संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा वर्षभरासाठी ‘दत्तक शाळा’ म्हणून स्वीकारून तेथील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. यामुळे शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रांना भेट देऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी, पालकांशी संवाद साधावा आणि शासकीय शाळांमधील विविध सुविधा, शिष्यवृत्ती, नाविन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. समाजमाध्यमे, ग्रामस्तरीय जनजागृती, दवंडी आणि पालकांच्या व्हॉट्सप गटांद्वारेही शाळा सुरू होण्याबाबत व्यापक प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे.

यंदाच्या प्रवेशोत्सवासाठी जिल्हास्तरावर विशेष नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली असून ‘शाळा प्रवेशोत्सव कक्ष’ स्थापन करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या शाळा भेटींची माहिती, छायाचित्रे आणि अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदविले जाणार आहेत.

शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. शाळा प्रवेशोत्सव २०२६ हा उपक्रम विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक दृढ करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाढती उपस्थिती आणि सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात यावे, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू असून त्याद्वारे ‘शिक्षणसमृद्ध महाराष्ट्र’ घडविण्याच्या दिशेने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकले जात आहे.

**– ब्रिजकिशोर झंवर**
विभागीय संपर्क अधिकारी

# विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळांनाही प्राधान्य द्यावे - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

### *शाळा प्रवेशोत्सवांतर्गत विद्यार्थ्यांचे स्वागत*



**मुंबई**/वृत्तसेवा: शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून व्यक्तिमत्त्व विकास, संस्कार संवर्धन आणि जीवनाला दिशा देणारे केंद्र आहे. आज विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले शिक्षण, मूल्ये आणि संस्कारच उद्याचे जागरूक नागरिक, संवेदनशील व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्रनिर्माते घडवणार आहेत. शिक्षणाबरोबरच स्वस्थ शरीर आणि स्वस्थ मन जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असून विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळ, योग आणि संगीतालाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील मुंबई पब्लिक स्कूलमध्ये ‘शाळा प्रवेशोत्सव’ आयोजित करण्यात आला. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, शिक्षण समिती अध्यक्ष राजेश्री शिरवडकर, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) डॉ.अविनाश ढाकणे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी नवीन शैक्षणिक वर्षास प्रारंभ करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्रथमच शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येऊन जिज्ञासू वृत्ती जोपासावी, प्रश्न विचारावेत आणि शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित संस्कार व कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संकल्पित केलेल्या ‘विकसित भारत २०४७’च्या स्वप्नपूर्तीत आजच्या विद्यार्थी पिढीची सर्वाधिक महत्त्वाची भूमिका राहणार आहे, असे प्रतिपादन राज्यपाल यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांमध्ये संगीत आणि योग शिक्षणाला अधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता असल्याचे राज्यपालांनी सांगितले. संगीतामुळे संवेदनशीलता आणि सर्जनशीलता विकसित होते, तर योगामुळे शरीर आणि मन निरोगी राहते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक मित्र जोडावेत, एकमेकांकडून शिकावे, एकत्र खेळावे. मोबाईल फोनवर वेळ घालविण्याऐवजी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपालांनी केले. खेळामुळे आरोग्य, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते. निरोगी शरीर आणि निरोगी मन ही यशाची भक्कम पायाभरणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यपालांनी विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व, संस्कार आणि शिक्षण मजबूत करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे नमूद केले. आजच्या युगात कौशल्य विकास, क्रीडा, बहुभाषिक शिक्षण आणि डिजिटल साक्षरता महत्त्वाची असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी सक्षम आणि आत्मनिर्भर बनविणारे शिक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्यासाठी कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, शाळा प्रशासन, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे राज्यपालांनी कौतुक केले. तसेच पालकांनीही मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेऊन त्यांना स्वप्नपूर्तीसाठी सातत्याने प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले.

महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यात येत असून भविष्यातील उत्कृष्ट नागरिक घडविण्यासाठी शिकण्याची प्रक्रिया आनंददायी करण्यावर भर असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या काळात महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी मागे राहणार नाहीत याची दक्षता घेतली जात असल्याचे सांगून राज्य मंडळाबरोबरच सीबीएसई, आयसीएसई अभ्यासक्रमांचे शिक्षण देखील दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. शिक्षणाबरोबरच संगीत, खेळ यांनाही महत्व देण्यात येत असून दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून उत्कृष्ट नागरिक घडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपालांचे आभार मानताना अतिरिक्त आयुक्त डॉ.अविनाश ढाकणे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली.

यावेळी राज्यपालांनी शाळेतील प्रवेश प्रक्रियेचे अवलोकन करून खगोलशास्त्र प्रयोगशाळा, पूर्व-प्राथमिक वर्ग, स्मार्ट क्लासरूम, संगणक प्रयोगशाळा आणि एफएलएन प्रयोगशाळेची पाहणी केली. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच मध्यान्ह भोजनाचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले.

# एक थेंब मानवतेचा, रक्त द्या जीव वाचवा




रक्तदान हे मानवतेचे सर्वोच्च दान मानले जाते. एका रक्तदात्याच्या रक्तदानामुळे तीन ते चार रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे स्वैच्छिक, विना मोबदला आणि नियमित रक्तदानाची चळवळ समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

रक्तदान क्षेत्रातील आधुनिक वैद्यकशास्त्राची भक्कम पायाभरणी करणारे महान शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टायनर यांनी सन १९०० मध्ये -इज रक्तगट प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या या क्रांतिकारी संशोधनामुळे सुरक्षित रक्त संक्रमण शक्य झाले आणि वैद्यकीय क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात झाली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त १४ जून हा दिवस जगभर ‘जागतिक रक्तदाता दिन’ म्हणून साजरा केला जातो.

यावर्षीच्या जागतिक रक्तदाता दिनाचे घोषवाक्य आहे - एक थेंब मानवतेचा, रक्त द्या जीव वाचवा (जपश ऊेि षि कींरपळीूं, ऋळींश इश्रेव, डरींश ङळींशी). हे घोषवाक्य रक्तदानाच्या माध्यमातून मानवतेची सेवा करण्याचा संदेश देते.

अपघातग्रस्त रुग्ण, मोठ्या शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना, कर्करोगग्रस्त रुग्णांना, थॅलेसेमिया व हिमोफिलिया बाधित व्यक्तींना, गंभीर रक्तक्षय असलेल्या रुग्णांना तसेच प्रसूतीदरम्यान रक्तस्राव झालेल्या मातांना अनेकदा रक्तदात्यांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. आधुनिक वैद्यकीय उपचारांमध्ये रक्ताबरोबरच प्लाझ्मा, प्लेटलेट्स आणि इतर रक्तघटकांचीही मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे रक्तदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय कर्तव्य आणि मानवतेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे.

रक्तदानामुळे दात्याच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. उलट, रक्तदानाच्या निमित्ताने नियमित आरोग्य तपासणीची संधी मिळते आणि समाजोपयोगी कार्य केल्याचे आत्मिक समाधानही लाभते.

देशातील रक्तसुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी युवक-युवतींनी नियमित रक्तदानासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. निरोगी युवक हे देशाच्या सुरक्षित रक्तपुरवठ्याचे खरे आधारस्तंभ आहेत. महिलांनीही वैद्यकीय निकष पूर्ण करून रक्तदानात सक्रिय सहभाग नोंदवावा. महिला रक्तदात्यांचा वाढता सहभाग हा समाजातील सकारात्मक परिवर्तनाचे प्रतीक आहे.

डिजिटल युगात सोशल मीडिया हे रक्तदान जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरत आहे. रक्तदान शिबिरांची माहिती प्रसारित करणे, गरजू रुग्णांना तातडीची मदत उपलब्ध करून देणे, नवीन रक्तदात्यांची नोंदणी करणे आणि रक्तदानासंदर्भातील गैरसमज दूर करणे यासाठी सोशल मीडियाचा सकारात्मक वापर होणे आवश्यक आहे.

रक्तदाते हे समाजाचे खरे जीवनदाते आहेत. त्यांच्या निस्वार्थ योगदानामुळे हजारो कुटुंबांना आशेचा किरण मिळतो. त्यामुळे रक्तदात्यांचा गौरव, सन्मान आणि प्रोत्साहन ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र, रक्तदान हे कोणत्याही प्रकारच्या आर्थिक लाभ, भेटवस्तू किंवा प्रलोभनासाठी नसून केवळ मानवतेच्या भावनेतून केले गेले पाहिजे. स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदान हीच सुरक्षित रक्तपुरवठ्याची सर्वात विश्वासार्ह गुरुकिल्ली आहे.

रक्तदान चळवळीची प्रमुख उद्दिष्टे

स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदानाला प्रोत्साहन देणे.

सुरक्षित रक्त व रक्तघटकांची सर्वांना उपलब्धता सुनिश्चित करणे.

युवक व महिलांना नियमित रक्तदाता म्हणून प्रेरित करणे.

रक्तदानाविषयीचे गैरसमज आणि भीती दूर करणे.

दुर्मिळ रक्तगट असलेल्या रक्तदात्यांची माहिती संकलित करून त्यांचे प्रभावी नेटवर्क तयार करणे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून रक्तदात्यांचे जाळे अधिक मजबूत करणे.

रक्तपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम करणे.

समाजात मानवता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीची भावना दृढ करणे.

चला, १४ जून ‘जागतिक रक्तदाता दिना’निमित्त नियमित रक्तदानाचा संकल्प करूया आणि मानवतेच्या या महान कार्यात सहभागी होऊन अनेकांना नवजीवन देऊया.

**संकलन :**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**रायगड-अलिबाग**

### जन्मशताब्दी वर्षानिमित्त गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांना सांगीतिक अभिवादन

# ‘गुणसागर निर्गुणी’मधून उलगडणार गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या अमूल्य संगीत रचनांचा सुरेल ठेवा

मुंबई, दि. १५ : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ‘गुणसागर निर्गुणी - अमूल्य संगीत रचनांचा जागर’ या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३२ गुणवंत गायक, गायिका आणि लोकप्रिय कलावंतांच्या संचातील हा अभिनव सांगीतिक आविष्कार बुधवार, १७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभादेवी, मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे रसिकांच्या भेटीला येणार आहे.

गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांनी आपल्या प्रतिभासंपन्न संगीत रचना, चिंतनशील सांगीतिक दृष्टिकोन आणि अभिजात संगीताच्या माध्यमातून भारतीय संगीतविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या रचनांमधील भावस्पर्शी सूर, आध्यात्मिक विचार आणि कलात्मक समृद्धी आजही रसिकांना मंत्रमुग्ध करतात. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून त्यांच्या अमूल्य संगीत वारशाला कृतज्ञ अभिवादन करण्यात येणार आहे.

‘गुणसागर निर्गुणी’ या कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन डॉ. वर्षा भावे यांनी केले असून, संगीत संयोजनाची जबाबदारी कमलेश भडकमकर यांनी सांभाळली आहे. या कार्यक्रमात ३२ गुणवंत गायक, गायिका आणि लोकप्रिय कलावंत पं. अभ्यंकर यांच्या निवडक आणि अजरामर संगीत रचनांना आपल्या सुरेल आवाजातून नव्याने सादर करणार आहेत. या कार्यक्रमात वाद्यसाथीसाठी अर्चिस लेले, निषाद करगीलकर, हनुमंत रावडे, अमोघ दांडेकर, भरत भडकमकर, दर्शना जोग, दीप वझे, प्रणव हरिदास आणि कमलेश भडकमकर हे नामवंत वादक सहभागी होणार असून त्यांच्या सुरेल साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलणार आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांगीतिक परंपरेचे जतन व संवर्धन करून हा सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम साकार होत आहे.

या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या अमूल्य संगीत रचनांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# भारतीय जहाजांवर अमेरिकेचे हल्ले!

होर्मुझ सामुद्रधुनीतून निर्वेधपणे आणि सुरक्षितरीत्या वाहतूक व्हावी, अशी भारताची इच्छा असून या विषयावर भारत आपले विचार स्पष्टपणे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडील, असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे, मात्र पंतप्रधान मोदी यावर मौन बाळगून आहेत.

ओमानच्या समुद्रात अमेरिकेच्या नौदलाने भारतीय खलाशी असलेल्या व्यापारी जहाजावर केलेला हल्ला भारताची चिंता वाढवणारा आहे. या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला, त्यानंतर काही तासांतच अमेरिकेच्या सैन्याकडून जलवीर या जहाजाला लक्ष्य करण्यात आले. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जहाजांना लक्ष्य करण्याचा पहिल्यांदाच प्रकार घडला असल्याने याबाबत भारताने कठोर भूमिका घेणे आवश्यक ठरले आहे. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत भारताने व्यापारी जहाजांवर झालेल्या तिन्ही हल्ल्यांचा निषेध केला आणि असे हल्ले थांबले पाहिजे हे ठणकावून सांगितले ते योग्यच. ८ जून रोजी पलाऊचा ध्वज असलेल्या आणि ज्यात २४ भारतीय खलाशी होते, त्या जहाजावर हल्ला झाला. तो अमेरिकेच्या नौदलाकडून झाला होता. त्यानंतर १० आणि ११ जून रोजीही असेच हल्ले झाल्याने ते हेतूपुरस्सर घडवून आणले जात असल्याच्या संशयाला जागा उरते. मात्र अमेरिकेच्या म्हणण्यानुसार या जहाजातून इराणमधून बेकायदेशीरपणे तेल वाहून नेले जात असल्याने ते रोखण्यासाठी हे हल्ले झाले. या जहाजांनी सूचनांचे पालन केले नाही आणि निर्बंधांचे उल्लंघन करून इराणमधून तेल वाहून नेण्याचा प्रयत्न केला, असा दावा अमेरिकेकडून करण्यात येत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याची गंभीर दखल घेत दिल्लीतील वरिष्ठ अमेरिकेच्या राजनैतिक अधिकार्यांना बोलावून कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे. या ताज्या घटनेमुळे इराण आणि अमेरिकेच्या युद्धामुळे




भारतापुढे निर्माण झालेल्या समस्यांमध्ये अधिकच भर पडली आहे. भारतीय जहाजांवर झालेल्या हल्ल्यात क्षेपणास्त्रांचा वापर झाल्याची कबुली अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिली आहे, त्यामुळे हा हल्ला म्हणजे अमेरिकेच्या नौदलाने अनवधानाने केलेली चूक किंवा अपघात म्हणता येणार नाही. त्यामागे इराणवरील आंतरराष्ट्रीय लष्करी नाकेबंदी कठोरपणे राबवण्याचा हेतु असू शकतो. या जहाजांनी त्यांच्या इशार्यांकडे दुर्लक्ष करून इराणमधून तेल वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रयत्न केल्याचा दावा अमेरिकेने केला आहे.

**कठोर भूमिकेची गरज**

आखाती प्रदेशात भारतीय ध्वज असलेली १३ जहाजे आणि १८ हजारांहून अधिक भारतीय खलाशी आहेत. किंबहुना आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीस खलाशी पुरवणारा भारत हा प्रमुख देश आहे. एकूण जागतिक खलाशांपैकी १५ टक्के भारतीय आहेत. त्यामुळे आपल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी भारताची भूमिका आक्रमक असणे हेही स्वाभाविक आहे. ८ जून रोजी हल्ला झालेले जहाज पलाऊ देशाचे होते. ते भारतीय ध्वजाचे नव्हते तरीही आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार युद्ध किंवा नाकेबंदीच्या काळातही व्यापारी जहाजांना ताब्यात घेण्याचे किंवा तपासणी करण्याचे काही नियम असतात, मात्र थेट क्षेपणास्त्र हल्ला करणे किंवा खलाशांचे प्राण घेणे हे मानवाधिकाराचे आणि सागरी कायद्यांचे सरळ उल्लंघन करणारे ठरते. त्याबद्दल भारताने जागतिक मंचावर अमेरिकेला जाब विचारणे अपेक्षित आहे, या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या तीन जणांच्या कुटुंबीयांना अमेरिकेकडून मदत मिळवून देणे आणि हल्ल्याची निष्पक्ष आंतरराष्ट्रीय चौकशीची मागणीही भारताने करायला हवी. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प पंतप्रधान मोदी यांना आपले निकटचे मित्र म्हणवतात. त्यामुळे मोदी यांनीही ट्रम्प यांच्याकडे या हल्ल्याबाबतची नाराजी स्पष्टपणे व्यक्त करायला हवी. ओमानचे आखात आणि होर्मुझची सामुद्रधुनी या व्यापारी मार्गावरून जाणार्या भारतीय कर्मचारी असलेल्या जहाजांना सुरक्षा पुरवण्यासाठी भारतीय नौदलाच्या युद्धनौका तैनात करण्याचीही आवश्यकता आहे. त्यामुळे भविष्यात अमेरिका किंवा कोणत्याही देशाच्या सैन्याकडून असा हल्ला होणार नाही. अमेरिकेने इराणला आर्थिक कोंडीत पकडण्यासाठी हे हल्ल्याचे पाऊल उचलले असले तरी दोन मोठ्या देशांच्या राजकारणात निष्पाप भारतीय खलाशांचा बळी जाणे हे भारतासाठी सहन होणारे ठरू नये.

---

## दु:खावर विजय मिळवा



सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख-समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता.

सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता. खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म-मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा-मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा-स्थळ मानत दु:ख-सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग-मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग-द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

## उपदेशकथा:संगीत



एके दिवशी बादशहा अकबर संगीतसम्राट तानसेनला म्हणाले, 'आपण संगीतातले जणू शिखर आहात. आपल्याला हे संगीत शिकवलं कुणी? तुझ्या गुरूचं गाणं ऐकायचं आहे.' तानसेन म्हणाले, 'त्याचं गाणं ऐकायला तर बादशहा आपल्याला तिथंवर जावं लागेल.' तानसेन व अकबर यमुनातीरावरच्या एका झोपडीपाशी रात्रीच्या अंधारात पोहोचले. पहाटे तानसेनांचे गुरू स्वामी हरिदास गाऊ लागले. त्यांचं गाणंकेवळ दिव्य होतं. दोघ नि:शब्द होऊन महालात परतले. बादशहा म्हणाले, 'असं संगीत तुझ्या गळ्यातून का येत नाही' त्यावर तानसेन उद्गारले 'मी काही मिळविण्यासाठी गातो' तर गुरुजींनी आधीच काही मिळविलेले आहे. गाणं हे माझ्याबाबतीत साधन आहे. त्यात ते पूर्ण भरून गेले आहेत आणितेच दिव्य संगीताच्या रुपानं ओसंडून वाहत आहे. मला प्रसिद्धी, प्रतिष्ठा, संपत्ती हवी आहे. पण मलादेखील जेव्हा साध्य लाभेल तेव्हा मी सुद्धा हे साधन सोडेन.''

**कथा उपदेश**

**काही मिळविण्याची आकांक्षा नसेल तर विशुद्ध कर्माचे फूल कारणाशिवाय उमलते. अंतर्यामातून वाहणाऱ्या स्वामी हरिदासांच्या दिव्य संगीतासारखे.**

---

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**अल्झायमर प्रतिबंध**




- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो. ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.

## २ Joke — विनोद




गिऱ्हाईक : मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला ङटिपफ द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## ३ Message — संदेश



Movie titles related to engg students: exams – socha na tha, classes – kabhi kabhi, question papers – na tum jano na hum,copying – yaarana, maths2 – asambhav, maths1 – mission impossible,environmental sciences – pyar mein kabhi kabhi, 1st semester – kuch to hai, 2nd semester – yeh kya ho raha hai,distinction – kal ho na ho, 1st class – raju bangaya gentleman, 2nd class – dil mange more fail – phir milenge

## ४ Thought — सुविचार



राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.

**– अज्ञात**


**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

---

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

२. रावण
५. सामाजिक नातेसंबंध
९. आश्रय
१२. चुकीचा अर्थ लावणे, गैरअर्थ
१३. वस्ती
१४. ग्रामीण बोलीत पुष्कळ, चिक्कार
१६. नंतर
१७. द्युतात हरल्यामुळे पांडवांना झालेली शिक्षा
२०. रम्य
२१. दाटी
२२. सुदैवी
२३. पुत्र
२५. नूतन
२६. भाकरीबरोबरचे लोकप्रिय कालवण
२८. भातलावणीसाठी तयार केलेले खड्डे
२९. वस्त्र
३३. रस्ता
३४. जनानखाना
३६. श्रावणात याची सार्वधिक पूजा होते
३७. क्रोध
३९. गाढव
४१. व्यापारी
४३. प्रजा
४५. पराभव
४६. खोटा, कृत्रिम
४८. सुखद गार
४९. निष्णात
५०. श्रीरामाची पत्नी
५१. गुंड
५२. खोट्याचा डाव
५२अ.प्रयत्न
५४. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती
५६. बेडूक
५८. दीप
५९. तमाशा
६१. पायपीट
६२. हल्ली
६३. पुष्पपराग
६५. चपखल प्रत्युत्तर देणारा
६७. वेतन
६९. श्रीमंत
७०. गाठोडे
७३. तांबडा
७४. देऊळ
७५. अविवाहित पुरुष
७७. ख्रिस्ती प्रार्थनास्थान
७८. समशेर
७९. विलंब
८०. टोमणा

### उभे शब्द

१. सूर्य
२. खलाशी
३. शिक्षा
४. काम होण्यासाठी देवाशी करार
५. सोशिक
६. मारला गेलेला
७. नवरामुलगा
८. गाव
१०. प्रसंगावधान
११. संताप
१५. भागाबाईला नाचवणारे वाद्य
१८. शिवभक्तांचे मुख्य तीर्थस्थान, बनारस
१९. सुगंध
२१. तंबोऱ्याचे वेष्टन
२४. होडी
२५. दसऱ्याआधीचा उत्सव
२७. विहीर
३०. भ्रतार
३१. अनुभव, प्रचीती
३२. धाक
३३. उत्सवाचा दिवस
३५. पतीचे घर
३७. अरिष्ट
३८. कुशल
४०. घाबरलेला
४२. जादूगाराची पिशवी
४४. सुरुवात
४५. वस्त्र विणण्याचे साधन
४६. वेलींचा मांडव
४७. हात राखून खर्च करणे
४८. ईदचे मिष्टान्न
५२. नेहरूंचे नाव
५३. अकबराच्या दरबारातील नऊ कर्तबगार
५५. बंदुकीची गोळी
५७. नेत्रांजन
६०. सळई
६१. ताकीद
६४. पाण्यातील सजीव
६६. पुन्हा पुन्हा
६८. वाहन
७०. पत्नी
७१. असंमती
७२. उपासना
७४. देशातच तयार झालेले
७६. भस्म

### आडवे उत्तर

२.दशानन ५.सहजीवन ९.आ-सरा १२.विपर्यास १३.वसाहत १४.रगड १६.मग १७.वनवास २०.रमणीय २१.गर्दी २२.नशीबवान २३.सूत २५.नव २६.झुणका २८.खाचर २९.वसन ३३.सडक ३४.राणीवसा ३६.सत्यनारायण ३७.संताप ३९.रासभ ४१.वाणी ४३.रयत ४५.हार ४६.लटका ४८.शीतल ४९.पारंगत ५०.सीता ५१.टग्या ५२.रडी ५२अ.जतन ५४.माका ५६.मंडूक ५८.दिवा ५९.वग ६१.तंगडतोड ६२.सध्या ६३.रज ६५.हजरजवाबी ६७.पगार ६९.मालदार ७०.बासन ७३.लाल ७४.देवालय ७५.कारा ७७.चर्च ७८.करवाल ७९.उशीर ८०.कोपरखळी

### उभे उत्तर

१.सविता २.दर्यावर्दी ३.शासन ४.नवस ५.सहनशील ६.हत ७.वर ८.नगर १०.समयसूचकता ११.राग १५.डमरु १८.वाराणसी १९.सुवास २१.गवसणी २४.तर २५.नवरात्र २७.आड ३०.नवरा ३१.प्रत्यय ३२.दरारा ३३.सणवार ३५.सासर ३७.संकट ३८.पटू ४०.भयभीत ४२.पोतडी ४४.आरंभ ४५.हातमाग ४६.लतामंडप ४७.काटकसर ४८.शीरकुरमा ५२.जवाहरलाल ५३.नवरत्ने ५५.काडतूस ५७.सुरमा ६०.गज ६१.तंबी ६४.जलचर ६६.वारंवार ६८.गाडी ७०.बायको ७१.नकार ७२.अर्चना ७४.देशी ७६.राख



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### तिलक वर्मा नडला, पण अंपायर्सचा अजब कारभार, चुकीचे निर्णय अन् भयंकर राडा

दंबुल्ला–श्रीलंकेत सुरू असलेल्या भारत, श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील तिरंगी मालिकेत आज सोमवारी एका थरारक आणि वादाने गाज–लेली मॅच सर्वांना पाहायला मिळाली. भारत अ आणि श्रीलंका अ यांच्यात झालेल्या लढतीत दोन्ही संघांचा स्कोअर समान झाल्याने मॅच सुपर ओव्हरमध्ये गेली. दोन्ही संघांनी ५० षटकात २६५ धावा केल्याने मॅच सुपर ओव्हरमध्ये गेली.सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेचे खेळाडू फलंदाजीला आले. भारताकडून अर्शद खानने गोलंदाजी केली. त्याने पहिल्या ४ चेंडूवर ९ रन दिल्या. त्यानंतर सलग दोन सिक्स दिल्या. अखेरचा चेंडू फुलटॉस दिला. मात्र थर्ड अंपायरने नो बॉल दिला.

### इंडियाला पराभवाचा धक्का!

डाम्बुला–ट्राय सीरिजमध्ये इंडिया ए आणि श्रीलंका ए यांच्यातला सामना टाय झाला, त्यानंतर ही मॅच सुपर ओव्हरमध्ये गेली. सुपर ओव्हरमध्ये टीम इंडियाला पराभवाचा धक्का बसला. अर्शद खानने शेवटची उत्कृष्ट ओव्हर टाकली, त्यामुळे टीम इंडियाने कमबॅक केलं. श्रीलंका ए ला शेवटच्या ओव्हरमध्ये श्रीलंका ए ला विजयासाठी ५ रनची गरज होती, तेव्हा अर्शद खानने फक्त ४ रन दिल्या. एवढंच नाही तर त्याने ९३ रनवर खेळणाऱ्या समरविक्रमाला यॉर्करवर बोल्ड केलं. याआधी पहिल्या सामन्यातही अर्शद खानच्या शेवटच्या ओव्हरमध्ये टीम इंडियाला ३ विकेट मिळाल्या होत्या, त्यामुळे टीम इंडियाचा विजय झाला होता.
सुपर ओव्हर होणार का नाही? यावरून मैदानात बराच ड्रामा झाला.

### वैभव सूर्यवंशी भिडला श्रीलंकेच्या गोलंदाजाशी!

मुंबई–भारत अ विरुद्ध श्रीलंका यांच्यामध्ये सामना झाला, मालिकेच्या चौथ्या सामन्यात श्रीलंकेने भारताला सुपर ओव्हरमध्ये पराभूत केले. आजच्या सामन्यामध्ये ड्रामा त्याचबरोबर खेळाडू आणि पंचांमध्ये बाचाबाची देखील पाहायला मिळाली. त्यानंतर, पंच आणि तिलक वर्मा यांच्यात सुपर ओव्हरबाबत चर्चा झाली. सुरुवातीला, मैदानावर अपुरा प्रकाश असल्यामुळे पंच सामना बरोबरीत संपवण्याचा आग्रह करत होते. त्यानंतर सामना झाला आणि श्रीलंकेने विजय मिळवल्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि श्रीलंकेच्या गोलंदाजामध्ये धक्काबुक्की पाहायला मिळाली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर काही क्षणातच व्हायरल होत आहे. सुपर ओव्हरमध्ये भारताकडून टीम इंडियाचा युवा फलंदाज वैभव आणि सूर्यांश शेंडगे हे फलंदाजीला आले होते.

### भारत-श्रीलंका सामन्यात हायव्होल्टेज ड्रामा!

दिल्ली–श्रीलंकेत सुरू असलेल्या तिंरगा मालिकेत सोमवारी रोमांचक सामना रंगला. यजमान श्रीलंका अ संघाविरुद्धच्या या सामन्यात इंडिया अ संघाला सुपर ओव्हरमध्ये पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना सूर्यांश शेडगे आणि विप्राज निगमच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने २६५ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंका अ संघानेही तितक्याच २६५ धावा करत सामना बरोबरीत आणला आणि निकालासाठी सुपर ओव्हरचा आधार घ्यावा लागला. सामना टाय की सुपर ओव्हर? मैदानावरच जबरदस्त ड्रामासामन्याच्या शेवटच्या चेंडूवर श्रीलंका अ संघाला विजयासाठी २ धावांची गरज होती.

### तिलक वर्मा अन् अंपायर्समध्ये जोरदार वाद!

मुंबई–भारतीय अ संघ सध्या श्रीलंकेत आहे. भारत अ, श्रीलंका अ आणि अफगाणिस्तान अ या तिन्ही संघांमध्ये तिरंगी मालिकेचा थरार सुरू आहे. श्रीलंकेतील डंबुला येथे पार पडलेल्या भारत अ आणि श्रीलंका अ या दोन्ही संघांमध्ये थरारक सामना रंगला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाचा संपूर्ण डाव ४९.२ षटकात २६५ धावांवर आटोपला. या धावांचा बचाव करताना भारताकडून अर्शद खानने पुन्हा एकदा निर्णायक षटक टाकलं. शेवटी हा सामना बरोबरीत सुटला. सामना बरोबरीत सुटल्यानंतर साम न्याचा निकाल लागावा म्हणून तिलक वर्मा सुपर ओव्हर खेळवण्यासाठी अंपायरला विनंती करताना दिसला. पण अंपायर्स विरोध करत असतानाही तिलक सुपर ओव्हरची मागणी करताना दिसून आला.

### पाकिस्तान विरूद्धच्यासामन्यात भारताचा दणदणीत विजय

बर्मिंगहॅम : अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माच्या फिरकीची जादू आणि उपकर्णधार स्मृती मानधनाच्या झंझावाती अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने आयसीसी महिला टी–२० विश्वचषक स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताने आपल्या पहिल्याच सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६४ धावांनी दारूण पराभव केला. भारताने विजयासाठी दिलेल्या १७१ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव अवघ्या १७ षटकांत १०६ धावांवर गडगडला. या दणदणीत विजयामुळे भारतीय संघाने गुणतालिकेत मोलाचे २ गुण मिळवले आहेत.

## महिला टी–२० विश्वचषकात बांगलादेशची विजयी सुरुवात



कुआलालंपूर : महिला टी–२० विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशने आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात करत नेदरलँड्सचा सहा गडी राखून पराभव केला. 'गट ब'मधील या रोमांचक सामन्यात पदार्पण करणार्या जुवैरिया फिरदौसने शानदार अर्धशतक झळकावत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. १४० धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेशने स्पर्धेतील आपल्या इतिहासातील सर्वात मोठा यशस्वी पाठलागही नोंदवला.
प्रथम फलंदाजी करताना नेदरलँड्सची सुरुवात निराशाजनक झाली. बांगलादेशच्या गोलंदाजांनी सुरुवातीच्या षटकांतच दबाव निर्माण केला. मात्र, कर्णधार बॅबेट डी लीड हिने संयमी फलंदाजी करत ४५ चेंडूंमध्ये ५० धावांची खेळी साकारली. तिच्या अर्धशतकाच्या जोरावर नेदरलँड्सने २० षटकांत ८ बाद १३९ धावांपर्यंत मजल मारली. बांगलादेशकडून मारुफा अख्तरने दोन बळी घेत प्रभावी कामगिरी केली.१४० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशने आक्रमक सुरुवात केली.

### जुवैरिया फिरदौसची अर्धशतकी खेळी

जुवैरिया फिरदौस आणि दिलारा अख्तर यांनी पहिल्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी रचली. जुवैरियाने वेगवान आणि फिरकी गोलंदाजांचा आत्मविश्वासाने सामना करत ३२ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले. तिच्या खेळीत सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता.
तथापि, कॅरोलिन डी लँगेने सलग दोन बळी घेत नेदरलँड्सला सामन्यात पुनरागमन करून दिले. जुवैरिया, निगार सुल–ताना आणि दिलारा अख्तर झटपट बाद झाल्याने बांगलादेशची अवस्था ४ बाद ८५ अशी झाली. मात्र, शर्मिन अख्तर आणि शोर्ना अख्तर यांनी संयम राखत संघाला संकटातून बाहेर काढले. या दोघींनी पाचव्या विकेटसाठी ५६ धावांची नाबाद भागीदारी करत विजयावर शिक्कामोर्तब केले.शर्मिन अख्तरने नाबाद ३७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. बांगलादेशने १९.१ षटकांत ४ बाद १४१ धावा करत सामना जिंकला आणि स्पर्धेतील आपली सुरुवात विजयानिशी केली.
संक्षिप्त धावफलक
नेदरलँड्स २० षटकांत १३९/८ (बॅबेट डी लीड ५०; मारुफा अख्तर २–३१) यांचा बांगलादेशकडून १९.१ षटकांत १४१/४ (जुएरिया फिरदौस ५०, शर्मिन अख्तर ३७*, दिलारा अख्तर २६; कॅरोलिन डी लँगे २–२७) सहा गडी राखून पराभव.

## स्वीडनची ट्युनिशियावर रोमहर्षक विजय

मॉन्टेरी (मेक्सिको) : यासीन अयारीने केलेल्या दोन गोलच्या जोरावर स्वीडनने २०२६ च्या विश्वचषकात आपला दबदबा निर्माण करताना 'फ' गटातील सामन्यात ट्युनिशियाचा ५–१ असा पराभव केला. या मोठ्या विजयासह स्वीडनने गटात गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. स्वीडनच्या या विजयात अलेक्झांडर इसाक आणि व्हिक्टर ग्योकेरेस यांनी प्रत्येकी एक गोल करण्यासह एका गोलसाठी सहाय्य केले. अन्य एक गोल मथायस स्वानबर्गने नोंदवला. जागतिक क्रमवारीत ३९ व्या स्थानावर असलेला स्वीडनचा संघ २०२२ च्या विश्वचषकासाठी पात्र ठरू शकला नव्हता. दुसरीकडे, ट्युनिशियासाठी ओमर रेकिकने एकमेव गोल केला.
वडिलांच्या देशाबद्दल आदर
पहिल्या गोलनंतर अयारीने जास्त जल्लोष केला नाही; त्याने ट्युनिशियाबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी फक्त आपले हात वर केले, कारण त्याच्या वडिलांचा जन्म ट्युनिशियामध्ये झाला आहे.



ट्युनिशियाकडून ओमर रेकिकचा एकमेव गोल; स्वीडनने 'फ' गटातील सामन्यात निर्माण केला दबदबा;विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत ट्युनिशियाविरुद्ध दोन शानदार गोल करून

## टीम इंडियाच्या बॅट्समनच्या मैदानात केल्यां२ घोडचुका!

मुंबई–क्रिकेटच्या मैदानात एक–एक रन मॅचचे चित्र बदलतं हे आपण अनेकदा पाहतो. श्रीलंका ए विरुद्धच्या सामन्यात इंडिया ए ने एकही बॉल न टाकता विरोधी टीमला १० रन दिल्या. ट्राय सीरिजच्या या सामन्यात विप्रज निगमची घोडचूक टीम इंडियाला महागात पडली. अंपायरनी इंडिया ए ला १० रनची पेनल्टी लावली. हा दंड खेळपट्टीच्या संरक्षित भाग (प्रोटेक्टेड एरिया) वर वारंवार पळाल्यामुळे लावण्यात आला.
काय आहे पूर्ण प्रकरण?
मॅचच्या ३४व्या आणि ३७व्या ओव्हरमध्ये ऑन फिल्ड अंपायर प्रगीथ रामबुकवेला आणि शांथा फोन्सेका यांनी इंडिया ए ला दोन वेळा ५–५ रनची पेनल्टी लावली. विप्रज निगम ३४व्या ओव्हरमध्ये पहिल्यांदा पिचच्या मधून धावला, त्याआधीही अंपायरनी त्याला वॉर्निंग दिली होती. यानंतर ३७व्या ओव्हरमध्येही त्याने पुन्हा एकदा तीच चूक केली.विप्रज निगमने बॉल थर्ड मॅनच्या दिशेने खेळून रन काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा नॉन स्ट्रायकर सूर्यांश शेडगेने त्याला परत पाठवलं. क्रीजमध्ये परत येत असताना विप्रज निगम पिचच्या मधोमध धाव–ला.
काय आहे नियम?
क्रिकेटच्या नियमानुसार बॅटरला पिचच्या संरक्षित भागातून रन काढण्यासाठी धावता येत नाही. असं केल्यामुळे खेळपट्टीचं नुकसान होतं, ज्यामुळे दुसऱ्या इनिंगमध्ये बॅटिंग करणाऱ्या टीमला अडचणींचा सामना करावा लागतो. वॉर्निंग दिल्यानंतरही बॅटरने तिच चूक केली तर अंपायर ५ रनची पेनल्टी लाव–तो. इंडिया ए कडून दोन वेळा ही चूक झाली.
म्हणून श्रीलंकेला १० रनची पेनल्टी मिळाली.विप्रज निगमनेच टीमला सावरलं विप्रज निगमने ही चूक केली .


## मोरोक्कोच्या आक्रमक खेळासमोर ब्राझील हतबल; सामना बरोबरीत

न्यूयॉर्क : फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या तिसर्या दिवशी अनेक रोमांचक निकाल पाहायला मिळाले. मोरोक्कोने बलाढ्य ब्राझीलला बरोबरीत रोखून मोठा धक्का दिला, तर ३२ वर्षांनंतर विश्वचषकात पुनरागमन करणार्या स्कॉटलंडने विजयाने आपल्या मोहिमेची सुरुवात केली. याशिवाय कतारने स्वित्झर्लंडला बरोबरीत रोखत महत्त्वाचा गुण मिळवला.'गट सी'मधील सामन्यात मोरोक्कोने पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलला १–१ अशा बरोबरीत रोखून सर्वांचे लक्ष वेधले.
सामन्याच्या २१व्या मिनिटाला इस्माईल सायबारीने गोल करत मोरोक्कोला आघाडी मिळवून दिली. ब्राझीलवर सुरुवातीप–ासून दबाव टाकणार्या मोरोक्कोने पहिल्या अर्ध्या तासात अनेक आक्रमणे केली. मात्र, ३२व्या मिनिटाला विनिसियस ज्युनियरने शानदार गोल करत ब्राझीलला बरोबरी साधून दिली. त्यानंतर दोन्ही संघांना विजयी गोल करता आला नाही.
दुसर्या सामन्यात कतारने अखेरच्या क्षणी गोल करत स्वित्झर्लंडविरुद्ध १–१ अशी बरोबरी साधली. ब्रिल एम्बोलोने १७व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत स्वित्झर्लंडला आघाडी मिळवून दिली होती. मात्र, अतिरिक्त वेळेत बौआलेम खोखीने हेडरद्वारे गोल करत कतारला मौल्यवान गुण मिळवून दिला.'गट सी'मधील आणखी एका सामन्यात स्कॉटलंडने हैतीचा १–० असा पराभव केला. १९९८ नंतर प्रथमच विश्वचषकात खेळणार्या स्कॉटलंडसाठी जॉन मॅकगिनचा २८व्या मिनिटातील गोल निर्णायक ठरला. या विजयासह स्कॉटलंडने ३२ वर्षांनंतर विश्वचषकातील विजयाची चव चाखली.दरम्यान, 'गट डी'मध्ये ऑस्ट्रेलियाने तुर्कीवर २–० अशी मात केली. नेस्टोरी इरानकुंडा आणि कॉनर मेटकाफ यांच्या गोलांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने स्पर्धेतील आपले पहिले तीन गुण मिळवले.तिसर्या दिवसाच्या सामन्यांनंतर स्पर्धेतील चुरस अधिक वाढली असून अनेक गटांमधील समीकरणे रंगतदार बनली आहेत.



## बीपीएलचा दर्जा सुधारल्याशिवाय परदेशी क्रिकेटपटू आकर्षित होणार नाहीत : लिसा

मीरपूर : बांगलादेश प्रीमियर लीग (बीपीएल) ही परदेशी क्रिकेटपटूंना आकर्षित करण्यासाठी स्पर्धेचा एकूण दर्जा उंचावणे आणि मानधनासंदर्भातील समस्या सोडवणे आवश्यक असल्याचे मत वर्ल्ड क्रिकेटर्स असोसिएशन (डब्ल्यूसीए)च्या अध्यक्षा लिसा स्थळेकर यांनी व्यक्त केले.मीरपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना स्थळेकर यांनी सांगितले की, डब्ल्यूसीएने अलीकडेच जगभरातील प्रमुख टी–२० लीगचे मूल्यांकन करणारा अह–वाल प्रसिद्ध केला आहे. खेळाडूंचे हित, करारांची अंमलबजावणी, स्पर्धेचे व्यवस्थापन आणि व्यावसायिक वातावरण या निकषांवर आधारित या अहवालात बीपीएलला केवळ



२२.६ गुण मिळाले असून ती तळाच्या स्थानावर आहे. तर 'द हंड्रेड' ७५.२ गुणांसह अव्वल, एसए२० दुसर्या आणि आयपीएल तिसर्या स्थानावर आहे.
स्थळेकर यांनी नव्याने स्थापन झालेल्या क्रिकेट वेल्फेअर असोसिएशन ऑफ बांगलादेश (सीडब्ल्यूएबी) आणि बांगलादेश क्रिकेट बोर्ड (बीसीबी) यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज अधोरेखित केली. बीपीएलमध्ये मानधन न मिळणे आणि स्पर्धेच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. या समस्यांवर प्रभावी उपाययोजना झाल्यास परदेशी खेळाडूंचा स्पर्धेवरील विश्वास वाढेल, असे त्या म्हणाल्या.बीपीएलकडे उत्कृष्ट सुविधा आणि दर्जेदार क्रिकेटपटू असल्याचे नमूद करत त्यांनी स्पर्धेला अधिक व्यावसायिक बनविण्याचे आवाहन केले. ही अशी स्पर्धा असावी जिथे जगभरातील क्रिकेटपटू खेळण्यासाठी उत्सुक असतील. त्यासाठी स्पर्धेची प्रतिमा सुधारण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

## इराण फुटबॉल संघाचा विश्वचषक प्रवास

अमेरिका आणि इराणमधील युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम इराणच्या फुटबॉल संघावर झाला असून, त्यांचा विश्वचषकाचा अनुभव अत्यंत आव्हानात्मक ठरत आहे.यासिन अयारीच्या दोन गोलांसह स्वीडनचा ट्युनिशियावर ५–१ ने दणदण–ीत विजय–मॉन्टेरे, मेक्सिको: २०२६ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेत स्वीडनने आपल्या आक्रमक खे–ळाचे प्रदर्शन करत ट्युनिशियाचा ५–१ असा धुव्वा



उडवला. या विजयामुळे ...प्रमुख मुद्दे:कर्णधाराची खंत: इराणचा कर्णधार मेहदी तारेमी याने व्यक्त केले की, अमेरिकेसोबत सुरू असलेल्या युद्धाच्या तणावामुळे संघाला खेळाचा आनंद घेता येत नाहीये. या तणावाचा परिणाम संघाच्या मानसिकतेवर आणि तयारीवर झाला आहे.लॉजिस्टिक्स आणि व्हिसा समस्या: युद्धामुळे इराणने त्यांचे प्रशिक्षण शिबिर अमेरिकेतून मेक्सिकोमधील तिजुआना येथे हलवले आहे.

## मुंबई लीगच्या अंतिम सामन्यात खेळाडूंमध्ये शाब्दिक चकमक

मुंबई : टी२० मुंबई लीगच्या अंतिम सामन्यात एमएससी मराठा रॉयल्सने एआरसीएस अंधेरीचा ८ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले. मात्र, या सामन्याची चर्चा विजयापेक्षा मैदाना–वरील वादामुळे अधिक रंगली. मराठा रॉयल्सचा वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे आणि अंधेरीचा फलंदाज गौरव जठार यांच्यात झालेली शाब्दिक चकमक सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे.१३ जून रोजी झालेल्या या अंतिम सामन्यात अंधेरीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. चिन्मय सुतारच्या अर्धशतकाच्या जोरावर मराठा रॉयल्सने २० षटकांत ५ बाद १५४ धावा केल्या. प्रत्युत्तरात अंधेरीचा संघ २० षटकांत ८ बाद १४६ धावांपर्यंतच मजल मारू शकला.सामन्यातील सर्वाधिक नाट्यमय क्षण १९व्या षटकात पाहायला मिळाला. विजयासाठी झुंज देत असताना गौरव जठारने आक्रमक फलंदाजी करत षटकार ठोकला. मात्र, पुढच्याच चेंडूवर तो एलबीडब्ल्यू बाद झाला. त्यानंतर मराठा रॉयल्सच्या खेळाडूंनी जल्लोष केला. हा जल्लोष जठारला न रुचल्याने त्याचा आणि तु–षार देशपांडेचा वाद झाला. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून पंच आणि इतर खेळाडूंनी हस्तक्षेप करत दोघांना शांत केले.मैदानावरील वाद थांबल्यानंतरही तणाव कायम राहिला. सामन्यानंतर मराठा रॉयल्सच्या एका खेळाडूचा अंधेरीच्या डगआउटजवळील खेळाडूंशी वाद झाल्याचेही पाहायला मिळाले. दोन्ही संघांच्या सपोर्ट स्टाफने मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली.या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून पंचांच्या अहवालानंतर संबंधित खेळाडूंवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## लातूर जिल्ह्यात 'चेक बाऊन्स' प्रकरणी
### *१८ जुलै व २१ नोव्हेंबरला विशेष लोक अदालतीचे आयोजन*

**लातूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशान्वये लातूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १८ जुलै २०२६ आणि २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार दाखल असलेल्या 'चेक बाऊन्स' (धनादेश अनादरीत) प्रकरणांसाठी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या पक्षकारांची तसेच बँक व वित्तीय संस्थांची या कलमानुसारची प्रकरणे सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या सर्वांनी या विशेष लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

या विशेष लोक अदालतीमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी समान संधी मिळते आणि दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड आपसी संमतीनेच केली जाते. न्यायालयात वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रियेला फाटा देत, येथे एकाच दिवशी आपसी संमतीने प्रकरण निकाली निघत असल्याने पक्षकारांचा मौल्यवान वेळ व पैसा वाचतो, तसेच प्रकरण निकाली निघाल्यावर भरलेले न्यायालयीन शुल्क देखील नियमानुसार परत मिळते. त्यामुळे सर्व संबंधित पक्षकार आणि विधीज्ञांनी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणावर आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## नौदल माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी १९ जून रोजी लातूर येथे विशेष बैठक

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई येथील नौदल अधिकारी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत १९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला मुंबईहून येणारे नौदल अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, ते माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या, तसेच प्रलंबित प्रश्न जाणून घेणार आहेत. तरी आपल्या अडीअडचणी व समस्या मांडण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांनी १९ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे यांनी केले आहे.

# काटगाव येथे 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात
## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी:** : राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवात रूपांतरित करणे, या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा 'शाळा प्रवेशोत्सव'चा लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.



लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी, लातूरचे गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. याच पार्श्वभूमीवर काटगाव येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन अत्यंत आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेचे पर्यावरण अधिक समृद्ध आणि हिरवेगार व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, हा यामागील उद्देश होता. शाळेतील विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपण करून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने राज्यभर हा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना देण्याची 'पहिले पाऊल' ही अभिनव संकल्पनाही राबविली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात काटगाव येथील शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री. मांदळे, केंद्रप्रमुख वामन राठोड, शिक्षक विजय माळाळे, गोविंद गारकर आणि श्रीमती राजमाले, श्रीमती तांदळे, श्रीमती खंडागळे, श्रीमती लांडगे, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती सय्यद उपस्थित होत्या.

**विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी**

आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण देवून त्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देवून या अनुषंगाने शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

## महानगरपालिका शाळा प्रवेशोत्सव २०२६
# ज्ञानाची नवी पहाट – प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशाचा संकल्प

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहरातील महानगरपालिका शाळा क्र. ९ आणि महानगरपालिका शाळा क्र. ११, साळे गल्ली येथे आज प्रवेशोत्सव २०२६ अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभंगे, मनपा शिक्षणाधिकारी श्वेता नागणे हे मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व खाऊ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले.




तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

आयुक्त मानसी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसापासून मन लावून अभ्यास करा, चांगले संस्कार आत्मसात करा आणि भविष्यात गुणवंत नागरिक बना, असा प्रेरणादायी संदेश दिला. यावर्षी लातूर महानगरपालिकेच्या सर्व १६ शाळांमध्ये प्रवेशोत्सव २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिका शाळा आता विकासाच्या दिशेने भक्कम पाऊले टाकत असून शिक्षण क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व सुधारणा राबविण्यात येत आहेत. शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे पालकांचा महानगरपालिका शाळांकडे कल वाढत असून अधिकाधिक पालक आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी मनपा शाळांना पसंती देत आहेत.

उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला असून सर्व शाळांच्या परिसरात आनंद, उत्साह आणि नवचैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले.

# लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ; खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते ज्येष्ठ खेळाडू व विजेत्यांचा गौरव!

**लातूर/प्रतिनिधी:**

लातूर: दयानंद शिक्षण संस्था व लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'स्व. राजगोपाल भार्गव स्मृती' जिल्हास्तरीय अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाली. लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यंदा आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत असून, या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचा शानदार बक्षीस वितरण आणि ज्येष्ठ बॅडमिंटनपटूंचा सत्कार सोहळा दयानंद शिक्षण संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहाशेजारील मैदानावर पार पडला. या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार मा. डॉ. शिवाजीराव काळगे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी होते. याप्रसंगी लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रदीप राठी, लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी, असोसिएशनचे सचिव आशिष बाजपेयी, चैतन्य भार्गव, कमल अग्रवाल आणि डॉ. शिवपुजे यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.




याप्रसंगी बोलताना खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कौशल्याचे कौतुक केले आणि लातूर जिल्ह्यातून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू तयार होतील, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शारीरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच आपली एकाग्रता वाढवण्यासाठी खेळ खेळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होऊ न देता खेळामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला पाहिजे. दयानंद शिक्षण संस्थेसारखी संस्था महाराष्ट्रामध्ये विविध खेळांचे उत्तम नियोजन करून आपले विद्यार्थी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवत आहे. संस्थेने लातूरकरांसाठी दर्जेदार क्रीडांगणे उपलब्ध करून दिली आहेत, ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी संस्थेच्या योगदानाचा विशेष गौरव केला.

लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रदीप राठी यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, आमच्या पिढीला खेळाची प्रचंड आवड होती आणि आजच्या पिढीनेही ती जोपासणे गरजेचे आहे. पन्नास वर्षांपूर्वी खेळण्यासाठी शटलकॉक आणण्यासाठी सुद्धा आमच्याकडे पैसे नसायचे, तरीही आम्ही जिद्दीने खेळलो. आज लातूरमध्ये जे क्रीडा क्षेत्रात उत्तम जाळे आणि पायाभूत सुविधा उभी राहिलेली आहेत, ती केवळ श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्यामुळेच शक्य झाली आहे. लाहोटी कुटुंबाची खेळाडू व मैदाने तयार करण्यामध्ये नेहमीच महत्त्वाची भूमिका राहिली आहे. लातूरने बॅडमिंटनमध्ये घेतलेल्या भरारीच्या पाऊलखुणा पन्नास वर्षांपूर्वी आपल्याला या भूमीत सापडतात, असे ते म्हणाले.

असोसिएशनचे सचिव श्री. आशिष बाजपेयी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, लातूरला बॅडमिंटन क्रीडागृहाची सुरुवात टाऊन हॉलपासून ५ ते १० रुपये गोळा करून झाली होती. लातूर आता केवळ 'शैक्षणिक पॅटर्न'मध्येच नव्हे, तर राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातही प्रकर्षाने पुढे येत आहे. वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा अभ्यासाबरोबरच खो-खो, पोहणे व बॅडमिंटन अशा खेळांची आवड निर्माण करावी. आज लातूरमध्ये ३५ ते ४० दर्जेदार बॅडमिंटन क्रीडांगणे उपलब्ध असून नवयुवकांनी याचा लाभ घ्यावा आणि आपले करिअर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

या स्पर्धेत मुलांच्या गटात उत्कर्ष सरवदे (११ वर्षांखालील एकेरी), सत्यजित पाटील (१३ वर्षांखालील एकेरी), सोहम मुळे (१५ वर्षांखालील एकेरी), देवेश कासले (१७ वर्षांखालील एकेरी), सुमित माडे (१९ वर्षांखालील व खुली मुले एकेरी) आणि रुद्र पाटील व सुमित माडे (खुली दुहेरी गट) यांनी विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात आर्या कोकरे हिने १३, १५ आणि १७ वर्षांखालील तिन्ही वयोगटांत एकेरीचे विजेतेपद मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली. स्पर्धेत उपविजेते ठरलेले खेळाडू पुढीलप्रमाणे राहिले: समर्थ पाटील नाईकवाडे (११ वर्षांखालील मुले एकेरी), वेदांत कटके (१३ वर्षांखालील मुले एकेरी), सर्वेश्वर बेदाडे (१५ आणि १७ वर्षांखालील मुले एकेरी), रुद्र पाटील (१९ वर्षांखालील व खुली मुले एकेरी), सुबोध टिळक आणि गौरव पांचाळ (खुली दुहेरी गट), आरोही म्हेत्रे (१३ वर्षांखालील मुली एकेरी), तुळशी बनसोडे (१५ वर्षांखालील मुली एकेरी) आणि कृतिका लवेकर (१७ वर्षांखालील मुली एकेरी).

या सोहळ्याप्रसंगी जिल्हा बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष डॉ. सतीश देशमुख, कोषाध्यक्ष श्री. मनीष राठी, प्रा. भरत चामले, श्री. कमल अग्रवाल, डॉ. शिवपूजे, चैतन्य भार्गव,श्री आनंद लाहोटी प्रामुख्याने उपस्थित होते. या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्री. आशिष सोमाणी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चैतन्य भार्गव यांनी मानले.

# सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात संपन्न
### संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत

**लातूर/प्रतिनिधी:** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, शाळेबद्दल आत्मीयता वाढावी आणि प्रत्येक बालक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे, या उद्देशाने लातूर येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



या प्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, मुख्याध्यापक इस्माईल शेख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत इयत्ता पाचवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय शिस्त, स्वच्छता, नियमित उपस्थिती, वाचन संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट यश संपादन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी बोलताना संस्था सचिव कालिदास माने म्हणाले, विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे ही शाळेची जबाबदारी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, सर्जनशीलता आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवून शिक्षकांशी सातत्याने संवाद साधावा. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या प्रवेशोत्सवामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी आणि प्रेरणादायी ठरली.

**MAEER Pune's**

## Maharashtra Institute of Dental Sciences & Research (Dental College), Latur.

Vishwanathpuram, Ambajogai Road, LATUR – 413512 (M.S.)
Ph.No. : (02382) 228063, 227703, **Email:**midsr.latur@gmail.com
Fax : (02382) 228063, Website:mitmidsr.ac.in

**WANTED (TEMPORARY)**

Applications are invited, in the prescribed format from the eligible candidates for the following posts.

**Professor/Reader/Lecturer/Tutor.**

**Requisite Qualification, Experience, other details & Prescribed application format are available on University Website:-www.muhs.ac.in**

**Last Date of application is 04/07/2026**

**Executive Director,**
MIDSR Dental College, Latur.

# विलास सह.साखर कारखाना युनिट-२ कडून ऊसाला प्रती मे.टन रू.३१३१.७२ प्रमाणे अंतीम ऊस बिल खात्यावर जमा







**लातूर/ प्रतिनिधी:**
उदगीर तालूक्यातील विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२ कारखान्याने यंदाचा गळीत हंगाम मांजरा परीवाराचे मार्गदर्शक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख, राज्याचे माजी मंत्री मा.आ. श्री. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्य.सह.बँकेचे अध्यक्ष मा.श्री. धिरज विलासराव देशमुख तसेच कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख व कारखान्याचे व्हा.चेअरमन मा.श्री.वैजनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला असून कमीत कमी दिवसात ५००९४१.४०५ मे.टन ऊसाचे गाळप करून ४८६८०० क्विं. साखरेचे उत्पादन केले असून आसवणी विभागाकडील सिरफ डायव्हर्जनसह १२.२१३ टक्के साखर उतारा प्राप्त केला आहे.

त्यासोबतच आसवणी प्रकल्पातून १ कोटी ३३ लाख ३५ हजार ब.ली. ईथेनॉल चे उत्पादन केले आहे. गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसाला प्रती मे.टन रू.३१३१.७२ प्रमाणे अंतीम ऊस दर निश्चीत झाला असून कारखान्याने यापुर्वी ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना रु.२८५० प्रती मे.टन प्रमाणे ऊस बिल अदा केले आहे. उर्वरीत रक्कम रू.२८१.७२ प्रती मे.टन प्रमाणे अंतीम ऊस बिल दि. १५ जुन २०२६ रोजी सबंधीत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे. श्रेध्देय विलासरावजी देशमुख साहेब यांनी लातूर जिल्याच्या सर्वांगीन विकासाचे उराशी बाळगलेले स्वप्न साकार करण्यासाठी राज्याचे माजी मंत्री मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विनंतीनुसार सन २०१३ मध्ये विलास सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून उदगीर तालूक्यातील बंद पडलेला प्रियदर्शीनी साखर कारखाना चालू केला व २०१४ पासून सदर कारखान्याने मांजरा परीवाराचे मार्गदर्शक सहकारमहर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख साहेब, राज्याचे माजी मंत्री मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करत असताना अल्पावधीतच गाळप, साखर उत्पादन तसेच जास्तीत जास्त ऊस दर यासर्व बाबीमध्ये नावलौकीक प्राप्त केला आहे तसेच कारखान्याच्या ६० के.एल.पी.डी. क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाची अल्पावधीमध्ये उभारणी करून पहिला हंगाम यशस्वीरीत्या पार पाडला.

एवढेच नाहीतर ६० के.एल.पी.डी. क्षमतेचा प्रकल्प असताना तो पहिल्याच हंगामामध्ये प्रतीदिन ९० के.एल.पी.डी. क्षमतेने चालवून १ कोटी ३३ लाख लि. ईथेनॉल उत्पादीत करून ऑईल डेपोला पुरवठा केला आहे. यावरून बंद पडलेला कारखानासुध्दा उत्तम नेतृत्वामुळे मांजरा परीवारामध्ये कसा उत्तम प्रकारे चालू शकतो व ऊस उत्पादकांना न्याय देवू शकतो हे कारखान्याचे संस्थापक मा.आ. श्री.अमित विलासराव देशमुख यांनी सिध्द करून दाखविले आहे.

प्रत्येक हंगामामध्ये ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त ऊस दर मिळत असल्यामुळे जळकोट, उदगीर, देवणी, शिरूळ अनंतपाळ, अहमदपूर व चाकुर या तालूक्यातील ऊस उत्पादकांमधून मांजरा परीवाराच्या माध्यमातून कारखान्याचे संस्थापक मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख यांनी ऊस उत्पादकांना खरा न्याय मिळवून दिल्याची भावना व्यक्त होत असून अंतीम ऊस दराचा हप्ता आगदी खरीप पेरणीच्या तोंडावर आल्यामुळे परीसरातील सर्व ऊस उत्पादकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशी माहिती कारखान्याचे व्हा.चेअरमन मा.श्री.वैजनाथराव शिंदे व सर्व मा.संचालक मंडळाने दिली. कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मधील बँक शाखेमध्ये जमा केलेली अंतीम ऊस दराची रक्कम घेण्यासाठी सबंधीत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी आपल्या बँक शाखेशी संपर्क करण्याचे आवाहन कार्यकारी संचालक श्री.आत्माराम पवार यांनी केले आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे घवघवीत यश

■ १२८ विद्यार्थ्यांना ९०+ पर्सेंटाईल, दरवर्षी प्रमाणेच MHT-CET परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.



**लातूर/ प्रतिनिधी:**
MHT-CET(PCM) कु. अंकिता पवार हिने ९९.६५ पर्सेंटाईल गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. कपिल मामनगर याने ९९.६२ पर्सेंटाईल गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. आर्यन गायकवाड याने ९९.३० पर्सेंटाईल मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला, तर दीपक धोत्रे याने ९९.०५ पर्से टाईल गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. MHT-CET परीक्षेत PCB ग्रुपमध्ये चि. तिवारी विद्यार्थ्याने ९९.८६९८२४५ पर्से टाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे चि. पाटील वेदांत या विद्यार्थ्याने ९९.८३६२३०८ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे तर चि. जोशी अवधूत या विद्यार्थ्याने ९९.६३२००३३ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ९९ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ११ विद्यार्थी आहेत.

९८ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण २४ विद्यार्थी आहेत तर ९५ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ६९ विद्यार्थी आहेत आणि ९० पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण १२८ विद्यार्थी आहेत. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललीतभाईजी शहा, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांतजी उटगे, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, शालेय समिती सदस्य मा. रवींद्रजी राठी, मा. प्रणवजी शहा, सी.ई.टी. सेलचे चेअरमन डॉ. चेतनजी सारडा, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, दयानंद विज्ञान महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर आणि पर्यवेक्षक डॉ. संध्या कोल्हे तसेच, प्रा. अनिलकुमार माळी, नीट समन्वयक डॉ कोमल गोमारे, सी ई टी समन्वयक प्रा. कविता जाधव प्रा. वेंकटेश कैले जेईई समन्वयक रवी कुमार आदीसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.



नळेगाव: येथील माननीय खासदार डॉक्टर शिवाजीकाळगे यांना संत कबीर प्रतिष्ठानच्या वतीने ग्रामीण रुग्णालय व विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. या प्रसंगी संत कबीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजगर मजकुरी व सहकारी उपस्थित होते.

## पक्ष फुटला...

पुनश्च पक्ष फुटला
गोंधळ सुरु लगेचं
पहिली पुनरावृत्ती
घडले जे जे मागेचं
घेत असता निर्णय
नको कायद्या पेच
हुशारीने खेळायचे
रे मुरलेले डाव पेचं
निलंबनाचा खटला
बसलीआधीचं ठेचं
काळजीघेतात सारे
घडू नये पुन्हा हेचं
पुन्हा कोर्टात धावा
दावे प्रति दावे तेचं
सोळानिलंबन लांबे
आडवे पडले मधेचं
शपथ पत्रे भरायची
साक्षी पुरावे हवेचं
नकार घंटा वाजवा
अरे तेआम्ही नव्हेचं
सत्ताडाव खेळताना
पुन्हा सुरु रस्सीखेचं
सत्तेसाठी काय पण
कुणा नाही आचपेचं
पक्ष फुटला तरीपण
खरे कार्यकर्ते उभेचं
बाकी सत्ताभिलाषी
तेचं पक्ष निष्ठ खरेचं

हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# स्मार्ट मीटर जनजागृतीसाठी महावितरणचे उपविभागनिहाय ग्राहक समाधान मेळावे



**लातूर/ प्रतिनिधी:**
महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी व वस्तुनिष्ठ माहिती देण्यासाठी उपविभागनिहाय ग्राहक समाधान मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांमध्ये ग्राहकांना स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, त्याचे फायदे तसेच वीज वापराचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे कसे करता येते याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

लातूर विभागातील लातूर शहर उपविभाग येथे मंगळवारी (दि.१६ जून) सकाळी ११ ते १ वाजेदरम्यान मेळावा घेण्यात येणार आहे तर लातूर ग्रामीण व रेणापूर उपविगामध्ये बुधवारी (दि.१७ जून), तसेच मुरुड उपविभाग येथे गुरूवारी (दि.१८ जून) सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावा घेण्यात येणार आहे.

तसेच निलंगा विभागांतर्गत मंगळवारी (दि.१६ जून) किल्लारी उपविभाग, बुधवारी (दि.१७ जून) कासारशिरशी उपविभागात तर गुरुवारी (दि.१८ जून) औसा, निलंगा व शिरुर अनंतपाळ उपविभागात सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावा घेण्यात येणार आहे.

त्याचबरोबर उदगीर विभागातील उदगीर शहर व ग्रामीण उपविभाग तसेच जळकोट उपविभात मंगळवारी (दि.१६ जून) सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेदरम्यान तर अहमदपूर, शिरुरताजबंद, चाकूर उपविभागात बुधवारी (दि.१७ जून) सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेदरम्यान स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावा घेण्यात येणार आहे.

महावितरणच्या वतीने सांगण्यात आले की, स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती रिअल-टाईममध्ये उपलब्ध होते. त्यामुळे वीज वापरावर नियंत्रण ठेवणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि ऊर्जाबचत करणे अधिक सुलभ होते. तसेच मीटर रीडिंगसाठी प्रत्यक्ष भेटीची आवश्यकता राहत नसल्याने बिलिंग प्रक्रिया अधिक अचूक व पारदर्शक बनते.

स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज वापर, बिलाची स्थिती, देय तारखा आणि इतर महत्त्वाच्या सूचना मोबाईलद्वारे तत्काळ मिळू शकतात. मीटरमध्ये छेडछाड झाल्यास त्याची माहिती त्वरित उपलब्ध होत असल्याने वीज वितरण व्यवस्थेची सुरक्षितता वाढण्यास मदत होते.

ग्राहक समाधान मेळाव्यांमध्ये उपस्थित अधिकारी व तंत्रज्ञ नागरिकांच्या सर्व शंकांचे निरसन करणार असून स्मार्ट मीटरविषयी पसरलेल्या गैरसमजांवरही वस्तुनिष्ठ माहिती दिली जाणार आहे. या उपक्रमामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद अधिक मजबूत होऊन डिजिटल व पारदर्शक वीज सेवेला चालना मिळेल, असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे.

महावितरणने सर्व ग्राहकांना संबंधित उपविभाग स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राहक समाधान मेळाव्यांना उपस्थित राहून स्मार्ट मीटरबाबत प्रत्यक्ष माहिती घेण्याचे आवाहन केले आहे.






Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६